॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

*** सुविचार ***

कर्म हीच पूजा आहे, आणि
प्रामाणिकपणा हीच खरी स्पिरिट आहे.

अहिल्यानगर | बुधवार, दि. २ सप्टेंबर २०२६ | वर्ष ७ वे | अंक ७२ वा | पाने ४ | किंमत ३ रुपये | RNI No. MAHMAR / 2012 / 47715 | 9420802145 | www.veerbhuminews.com

# भुईकोट किल्ला विकासाचा मार्ग मोकळा

## पालकमंत्री डॉ. विखे पाटील व आ. संग्राम जगताप यांच्या पाठपुराव्याला यश । महाराष्ट्र शासन-नगर लष्कर विभागात सामंजस्य करार

**● अहिल्यानगर । वीरभूमी-**

शहराच्या ऐतिहासिक वैभवाची साक्ष असलेल्या भुईकोट किल्ल्याच्या विकासाचा रखडलेला मार्ग आता मोकळा झाला आहे. भुईकोट किल्ला विकास प्रकल्पासाठी महाराष्ट्र शासन आणि नगर लष्कर विभाग यांच्यात सामंजस्य करार संपन्न झाला. जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया आणि स्टेशन कमांडर पी. सुनील कुमार यांच्या उपस्थितीत अहिल्यानगर येथील लष्कराच्या मुख्यालयात हा करार करण्यात आला. या करारामुळे किल्ल्याच्या संवर्धनासोबतच पर्यटनाच्या दृष्टीने प्रस्तावित विविध विकासकामांना प्रत्यक्ष गती मिळणार आहे.

पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी केंद्र सरकारच्या माध्यमातून भुईकोट किल्ल्याचा विकास करण्याची घोषणा केली होती. भाजपाचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील आणि आमदार संग्राम जगताप यांनी यासाठी विशेष पुढाकार घेत सातत्याने पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नातून केंद्र सरकारच्या पर्यटन मंत्रालयाच्या 'स्वदेश दर्शन २.०' योजनेअंतर्गत या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाला १७ मार्च २०२५ रोजी प्रशासकीय आणि वित्तीय मंजुरी मिळाली होती.

मात्र, भुईकोट किल्ला लष्कराच्या अखत्यारीत असल्याने प्रत्यक्ष विकासकामे सुरू करण्यासाठी लष्कराची अंतिम परवानगी आवश्यक होती. या प्रक्रियेमुळे प्रकल्पाला विलंब झाला. आता महाराष्ट्र शासन आणि नगर लष्कर विभागामध्ये सामंजस्य करार झाल्याने विकासकामांच्या अंमलबजावणीतील महत्त्वाचा अडथळा दूर झाला आहे.

भुईकोट किल्ल्याच्या ऐतिहासिक वास्तूचे संवर्धन करताना पर्यटकांसाठी आधुनिक आणि आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याचे नियोजन या प्रकल्पात करण्यात आले आहे. किल्ल्याच्या प्रवेशद्वारापासून परिसरातील पायाभूत सुविधांपर्यंत विविध विकासकामे केली जाणार आहेत.

यामध्ये भव्य प्रवेशद्वार, वाहनतळ आणि स्वच्छतागृहांची सुविधा उभारण्यात येणार आहे. तसेच किल्ल्याच्या ऐतिहासिक तटबंदीचे संवर्धन करून पर्यटकांना किल्ल्याचा इतिहास आणि वास्तूचे महत्त्व समजावे यासाठी इंटरप्रिटेशन सेंटर उभारण्यात येणार आहे.

किल्ल्याच्या पर्यटन विकासातील महत्त्वाचे आकर्षण ठरणाऱ्या कामांमध्ये बुरुज क्रमांक १ ते ११ पर्यंत सुमारे १३७० मीटर लांबीचा नेचर वॉकवे प्रस्तावित आहे. किल्ला परिसरात सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी मुक्त नाट्यगृह उभारण्यात येणार असून, परिसरातील प्रकाशव्यवस्था सुधारण्यासाठी सोलर स्ट्रीट लाईटिंग करण्यात येणार आहे.



> अहिल्यानगर जिल्ह्यात पर्यटनाच्या मोठ्या संधी आहेत. या पार्श्वभूमीवर केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथसिंह यांच्याकडे पत्रव्यवहार तसेच पाठपुरावा केला होता. यासाठी त्यांचे सहकार्य मिळाले. पर्यटनातून रोजगार निर्मिती करण्याचा आपला प्रयत्न असून, जिल्ह्याला लाभलेला ऐतिहासिक, नैसर्गिक आणि अध्यात्मिक वारसा स्थळांचा विकास करून स्थानिक पातळीवर रोजगार निर्मितीला प्राधान्य देण्याचा प्रयत्न आहे.
>
> **- डॉ. राधाकृष्ण विखे पाटील,** पालकमंत्री

भुईकोट किल्ला हा अहिल्यानगरच्या इतिहासातील महत्त्वाचा वारसा आहे. त्यामुळे या विकास प्रकल्पात किल्ल्याचे मूळ ऐतिहासिक स्वरूप आणि वास्तूचे महत्त्व जपत पर्यटनाच्या दृष्टीने आवश्यक सुविधा निर्माण करण्यावर भर देण्यात आला आहे. किल्ल्याच्या संवर्धनासोबत पर्यटकांसाठी सुविधा उपलब्ध झाल्याने भविष्यात भुईकोट किल्ला अहिल्यानगरच्या पर्यटन विकासाचे महत्त्वाचे केंद्र बनण्याची अपेक्षा आहे.

सामंजस्य करार झाल्यानंतर प्रकल्पाच्या पुढील कार्यवाहीला वेग येणार असून, संबंधित विभागांच्या आवश्यक परवानग्या आणि तांत्रिक प्रक्रिया पूर्ण करून प्रत्यक्ष विकासकामे हाती घेतली जाणार आहेत. भारतीय पुरातत्त्व विभाग, वन विभाग, पर्यावरण विभाग आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या आवश्यक मान्यतांचाही त्यात समावेश आहे.

घोषणेपासून मंजुरीपर्यंत आणि प्रशासकीय प्रक्रियेपासून आता सामंजस्य करारापर्यंत पोहोचलेल्या या महत्त्वाकांक्षी भुईकोट किल्ला विकास प्रकल्पाला अखेर प्रत्यक्ष अंमलबजावणीची दिशा मिळाली आहे. पालकमंत्री डॉ. विखे पाटील यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे अहिल्यानगरच्या ऐतिहासिक वैभवाला पर्यटन विकासाची जोड मिळणार असून, भुईकोट किल्ल्याचे रूपडे बदलण्याच्या दिशेने निर्णायक पाऊल पडले आहे.

## फोडणी

अरुण महादेव वाळुंज । अहिल्यानगर, मो. ९६२३८६८३७२

### चेहरा

काळीज सांगे चेहऱ्याला
एकदा हसून दाखव बरं
रडणारं की हसणारं?
तुझं रूप कुठलं खरं!

आजचा दिवस वेगळा
चित्र भविष्याच बघावं
संकट असू द्या लाख
हसताना सोबत दिसावं

## SPOT NEWS

### उपोषणाच्या चौथ्या दिवशी जरांगेंची तब्येत बिघडली!

**● जालना** - मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी अंतरवाली सराटी येथे बेमुदत उपोषणाला बसलेले मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाचा आज चौथा दिवस असून, आज दुपारी दीडच्या सुमारास त्यांची प्रकृती खालावल्याची माहिती समोर आली आहे. जरांगे पाटील यांना उलटी आणि मळमळ होत असल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे आंदोलनस्थळी उपस्थित असलेल्या समर्थकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. मनोज जरांगे पाटील हे मराठा आरक्षणाच्या विविध मागण्यांसाठी २९ ऑगस्टपासून अंतरवाली सराटी येथे बेमुदत उपोषणाला बसले आहेत. उपोषणाच्या चौथ्या दिवशी त्यांच्या प्रकृतीवर त्याचा परिणाम जाणवू लागला आहे. त्यांना मळमळ आणि उलटीचा त्रास झाल्याने आरोग्य पथकातील डॉक्टरांनी त्यांची तपासणी करण्याचा प्रयत्न केला. आंदोलनस्थळी तैनात असलेल्या आरोग्य पथकातील डॉक्टरांनी मनोज जरांगे पाटील यांची प्रकृती तपासण्यासाठी दोन-तीन वेळा प्रयत्न केला. मात्र, जरांगे पाटील यांनी वैद्यकीय तपासणी करून घेण्यास नकार दिल्याची माहिती आहे.

### सुटे तेल विक्रीला वर्षाची मुदतवाढ

**● मुंबई** - सनदी अधिकारी तुकाराम मुंढे अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त झाल्यापासून राज्यात खाद्यपदार्थातील भेसळ कमी झाली आहे. खाद्यपदार्थातील भेसळ, निकृष्ट दर्जाचे जेवण आढळताच तुकाराम मुंढे थेट कारवाई करताना दिसत आहेत. त्यांनी काही दिवसांपूर्वी सुट्ट्या तेलाची विक्री बंद केली. खाद्यतेलाची विक्री करताना तेलकंपन्यांना नियमांचे पालन करावे लागेल, असे तुकाराम मुंढे यांनी ठणकावून सांगितले. दरम्यान, तुकाराम मुंढे यांच्या या निर्णयामुळे छोटे व्यावसायिक, व्यापारांना मोठा फटका बसत आहे, असा दावा केला जात होता. असे असतानाच आता राज्य सरकारने तुकाराम मुंढे यांनी घेतलेला निर्णय फिरवला आहे.

# शेवगावात बाभळीच्या झाडाला गळफास घेतलेल्या अवस्थेत २२ वर्षीय तरुणाचा मृतदेह आढळला; चर्चांना उधाण

**● शेवगाव । वीरभूमी-**

आखेगाव रस्त्यावरील हॉटेल रिलॅक्स इनसमोर बाभळीच्या झाडाला शर्टच्या साहाय्याने गळफास घेतलेल्या अवस्थेत २२ वर्षीय युवकाचा मृतदेह आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली. प्रमोद भाऊराव ठुबे (वय २२, रा. लोळेगाव, ता. शेवगाव) असे मृत युवकाचे नाव आहे. दरम्यान, घटनास्थळी दारूच्या रिकाम्या बाटल्या, युवकाचे बूट तसेच विषाची बाटली आढळून आल्याचे सांगण्यात येत असल्याने हा प्रकार आत्महत्या आहे की घातपात, याबाबत संशय व्यक्त होत आहे.



मंगळवार (ता. १) रोजी सकाळी अखेगाव रस्त्यावर फिरण्यासाठी गेलेल्या काही नागरिकांना हॉटेल रिलॅक्स इनसमोर बाभळीच्या झाडाला युवकाचा मृतदेह लटकलेल्या अवस्थेत दिसून आला. ही बाब लक्षात येताच नागरिकांनी तातडीने पोलिसांना माहिती दिली. माहिती मिळताच पोलिस पथक घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी करून पंचनामा केला. त्यानंतर मृतदेह शेवगाव ग्रामीण रुग्णालयात वैद्यकीय तपासणी व शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला. घटनास्थळी दारूच्या रिकाम्या बाटल्या, मृत युवकाचे बूट व विषाची बाटली आढळून आले. युवकाचा मृतदेह बाभळीच्या झाडाला शर्टच्या साहाय्याने लटकलेल्या अवस्थेत आढळल्याने या घटनेबाबत परिसरात विविध चर्चा सुरू आहेत. घटनास्थळी आढळलेल्या वस्तूंचा मृत्यूशी नेमका काय संबंध आहे, याचा तपास पोलिसांकडून केला जात आहे.

प्रमोदच्या मृत्यूमागे नेमके कारण काय आहे, याबाबत अद्याप स्पष्टता झालेली नाही. घटनेपूर्वी प्रमोदसोबत आणखी कोणी व्यक्ती होती का? तो घटनास्थळी कसा पोहोचला? तसेच घटनास्थळी आढळलेल्या वस्तू तेथे कशा आल्या? याचा तपास पोलिसांकडून करण्यात येत आहे. त्यामुळे हा प्रकार आत्महत्या आहे की घातपात? याबाबतचा निष्कर्ष शवविच्छेदन अहवाल आणि पोलिस तपासानंतरच स्पष्ट होणार आहे. प्रमोद ठुबे हा लोळेगाव येथील रहिवासी असून, तो आपल्या वडिलांसमवेत आठवडे बाजारात भाजीपाला विक्रीचा व्यवसाय करत होता. तरुण मुलाच्या मृत्यूची बातमी समजताच कुटुंबीय, नातेवाईक व मित्रपरिवाराने शेवगाव ग्रामीण रुग्णालयात धाव घेतली. या घटनेमुळे ठुबे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. प्रमोदच्या पश्चात आई, वडील, एक बहीण व चुलते असा परिवार आहे. दरम्यान, पोलिसांनी या घटनेची अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पोलिस निरीक्षक मोहन बोरसे यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे.

# पहिल्याच दिवशी महागाईचा बॉम्बस्फोट

**● मुंबई । वीरभूमी-**

दहीहंडी, पोळा आणि गणेशोत्सव हे महत्त्वाचे सण तोंडावर असतानाच महागाईचा बॉम्ब फुटला आहे. सप्टेंबर महिना सुरू झाला तो महागाई आणि दरवाढ घेऊनच! दोन आठवड्यांपासून साखर किलोमागे तब्बल २० रुपयांनी महागली आहे, गूळ, वेलची अगोदरच महागले आहे. हे कमी म्हणून की काय मंगळवारपासून एक लिटर दुधासाठी आता ९ रुपये जास्त मोजावे लागत आहेत. शिवाय व्यावसायिक गॅस सिलिंडर, पाईपलाईनने पुरवला जाणारा गॅस, सीएनजी, रिक्षा आणि टॅक्सीचे भाडेही महागले आहे. यात महागलेल्या कुरिअर डिलिव्हरीचाही समावेश करावा लागेल.

१ सप्टेंबरपासून देशाच्या विविध भागांत व्यावसायिक एलपीजी सिलिंडर, सीएनजी आणि पीएनजीच्या दरात वाढ लागू झाली आहे. तेल विपणन कंपन्यांनी १९ किलोच्या व्यावसायिक एलपीजी सिलिंडरच्या किमतीत प्रति सिलिंडर ९.५० रुपये एवढी वाढ केली आहे. ही वाढ लगेचच लागू झाली आहे. दिल्लीमध्ये १९ किलोच्या व्यावसायिक एलपीजी सिलिंडरची किंमत आता २,७३८ वरून वाढून २,७४७.५० रुपये झाली आहे. चेन्नईमध्ये ही किंमत वाढून २,९१६.५० रुपये झाली आहे. तसेच ५ किलोच्या मानक एलपीजी सिलिंडरच्या दरातही २ रुपयांची वाढ झाली आहे. या दरवाढीचा थेट परिणाम रेस्टॉरंट, हॉटेल, ढाबे, मिठाईची दुकाने आणि स्वयंपाक तसेच इतर कामांसाठी व्यावसायिक एलपीजी वापरणाऱ्या अशाच प्रकारच्या इतर व्यवसायांवर होईल. १४.२ किलोच्या घरगुती एलपीजी सिलिंडरचे दर वाढलेले नाहीत.

मुंबईत सीएनजी आणि घरगुती पीएनजीचे (पाईपलाईन गॅस) दरही वाढले आहेत. मुंबईतील सीएनजी आणि पीएनजी दरातील वाढीचे कारण 'इनपुट गॅस'च्या (कच्च्या गॅसच्या) वाढत्या किमतीत आहे. महानगर गॅस लिमिटेडने मुंबई आणि आसपासच्या परिसरातील सीएनजीच्या दरात प्रति किलो २ रुपयांनी वाढ केली आहे. ही दरवाढ सोमवार (३१ ऑगस्ट) मध्यरात्रीनंतर लागू झाली आहे. परिणामी, मुंबई आणि लगतच्या भागात सीएनजीचा नवीन दर आता प्रति किलो ८८ रुपये झाला आहे. पश्चिम आशियातील संकटामुळे गॅसच्या किमतीत मोठी वाढ झाली आहे. त्यामुळे ही दरवाढ करावी लागत असल्याचे महानगर गॅस लिमिटेडकडून सांगण्यात येते.

# अहिल्यानगरसह तीन जिल्ह्यांतील सुमारे दीड लाख हेक्टर शेतीला मोठा फायदा

## डॉ. सुजय विखे पाटील यांनी पाळला शब्द । कुकडी पाटबंधारे प्रकल्पाच्या सुधारित खर्चालाही ५,७०४.५० कोटींची मान्यता

**● अहिल्यानगर । वीरभूमी-**

कुकडीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आणि गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या डिंबे ते माणिकडोह धरणांना जोडणाऱ्या सुमारे १६ किलोमीटर लांबीच्या बोगद्याच्या प्रकल्पाला राज्य सरकारने मंजुरी दिली आहे. तसेच पुणे जिल्ह्यातील कुकडी पाटबंधारे प्रकल्पासाठी ५,७०४.५० कोटी रुपयांच्या सुधारित खर्चासही मान्यता देण्यात आली आहे. या निर्णयामुळे कुकडी प्रकल्पातून १,४४,९१२ हेक्टर सिंचन क्षमता निर्माण होण्याचा मार्ग मोकळा झाला असून, अहिल्यानगरसह पुणे आणि सोलापूर जिल्ह्यांतील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. दक्षिण अहिल्यानगरचा दुष्काळी पट्टा दुष्काळमुक्त होण्यासाठी हा महत्त्वपूर्ण टप्पा असल्याचे माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत डिंबे-माणिकडोह बोगद्याच्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाला हिरवा कंदील मिळाला. गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला हा प्रश्न मार्गी लागल्याने कुकडीच्या डाव्या कालव्यावरील लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांच्या सिंचनाचा प्रश्न अधिक भक्कम होणार आहे.

या बद्दल बोलताना डॉ. सुजय विखे पाटील म्हणाले की, दक्षिण नगर भागातील शेतकऱ्यांना दिलेली आश्वासने पूर्ण करण्याच्या दिशेने आणखी एक महत्त्वाचा टप्पा पार पडला आहे. साकळाई योजनेचा प्रश्न मार्गी लावल्यानंतर आता डिंबे-माणिकडोह बोगद्याचा निर्णय झाला आहे. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला हा प्रश्न भाजप आणि आपणच मार्गी लावू, असे आश्वासन शेतकऱ्यांना दिले होते. आज राज्य मंत्रिमंडळाच्या निर्णयामुळे ते आश्वासन प्रत्यक्षात येत असल्याचा आनंद असल्याचे त्यांनी नमूद केले.

डिंबे आणि माणिकडोह ही दोन्ही धरणे कुकडी धरणमालिकेतील महत्त्वाची धरणे आहेत. माणिकडोह धरणाची क्षमता सुमारे १०.५ टीएमसी आहे. मात्र, स्थानिक पावसाच्या पाण्यावर हे धरण अपेक्षित प्रमाणात भरत नाही. दुसरीकडे, डिंबे धरण आणि त्याखालील घोड धरण भरल्यानंतर पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात अतिरिक्त पाणी खालच्या भागाकडे वाहून जाते.

या पार्श्वभूमीवर डिंबे धरणातून उपलब्ध होणारे अतिरिक्त पाणी सुमारे १६ किलोमीटर लांबीच्या बोगद्याद्वारे माणिकडोह धरणात वळविण्याची संकल्पना आहे. त्यामुळे पावसाळ्यात उपलब्ध होणाऱ्या अतिरिक्त पाण्याचा अधिक प्रभावी वापर करता येणार असून, माणिकडोह धरणाची साठवण क्षमता पूर्णपणे उपयोगात आणण्यास मदत होणार आहे.

माणिकडोह धरणातील पाण्याचा मुख्य उपयोग कुकडी डावा कालवा आणि त्याखालील लाभक्षेत्रातील शेतीसाठी होणार असल्याने या प्रकल्पाचा थेट फायदा शेतकऱ्यांना मिळणार आहे.

कुकडी पाटबंधारे प्रकल्पाच्या सुधारित खर्चास ५,७०४.५० कोटी रुपयांची मान्यता मिळाल्याने प्रकल्पाच्या सिंचन क्षमतेला मोठे बळ मिळणार आहे. या माध्यमातून १,४४,९१२ हेक्टर सिंचन क्षमता निर्माण होणार असून, पुणे, अहिल्यानगर आणि सोलापूर जिल्ह्यांतील शेतकऱ्यांना त्याचा मोठा लाभ होणार आहे. कुकडी डाव्या कालव्याच्या लाभक्षेत्रातील पुणे जिल्ह्यातील जुन्नर, अहिल्यानगर जिल्ह्यातील पारनेर, श्रीगोंदा व कर्जत तसेच सोलापूर जिल्ह्यातील करमाळा तालुक्यांसाठी हा निर्णय अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे. पावसावर अवलंबून असलेल्या शेतीला नियमित पाण्याचा आधार मिळाल्यास पीक पद्धतीत बदल होण्याबरोबरच शेती उत्पादन आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेलाही चालना मिळणार आहे.

डॉ. सुजय विखे पाटील म्हणाले की, दक्षिण अहिल्यानगरच्या दुष्काळी भागातील शेतकऱ्यांचा पाणीप्रश्न हा अनेक वर्षांपासूनचा विषय आहे. उपलब्ध पाण्याचा योग्य वापर, पावसाळ्यातील अतिरिक्त पाणी अडविणे आणि ते दुष्काळी भागाकडे वळविणे या दृष्टीने डिंबे-माणिकडोह बोगदा अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे.

डिंबे धरणातील अतिरिक्त पाणी माणिकडोहकडे वळविल्यानंतर त्याचा उपयोग कुकडी डावा कालवा आणि त्याखालील लाभक्षेत्रासाठी करता येणार आहे. त्यामुळे सिंचनासाठी उपलब्ध पाण्यात वाढ होऊन दक्षिण नगरच्या दुष्काळी पट्ट्याला मोठा दिलासा मिळेल.





दक्षिण नगरला दिलेली आश्वासने पूर्ण करण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले. ओव्हरब्रिज, साकळाई योजनेनंतर आता डिंबे-माणिकडोह बोगद्याचा निर्णय झाला आहे. कुकडी पाटबंधारे प्रकल्पाच्या सुधारित खर्चालाही मोठी मान्यता मिळाल्याने सिंचनाचा प्रश्न अधिक व्यापक पद्धतीने मार्गी लागणार आहे. शेतकऱ्यांच्या हितासाठी हा प्रकल्प पूर्णत्वास नेण्यासाठी पुढील पाठपुरावाही केला जाईल, असे डॉ. सुजय विखे पाटील यांनी सांगितले.

या महत्त्वपूर्ण निर्णयाबद्दल डॉ. सुजय विखे पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, उपमुख्यमंत्री सुनीत्राताई पवार तसेच राज्याचे जलसंपदा मंत्री व अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे विशेष आभार मानले. तसेच माजी मंत्री व आमदार बबनराव पाचपुते यांनीही या प्रश्नासाठी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याबद्दल त्यांनी त्यांचे आभार व्यक्त केले. राज्य सरकारने घेतलेल्या या निर्णयामुळे कुकडी प्रकल्पातील पाण्याचे नियोजन अधिक प्रभावी होऊन शेतकऱ्यांना शाश्वत सिंचनाचा आधार मिळेल, असा विश्वासही डॉ. सुजय विखे पाटील यांनी व्यक्त केला.

# SPOT NEWS

## शिराळ येथे घराचे कुलूप तोडून २ लाख ८२ हजारांची रोकड लंपास

**● पाथर्डी । वीरभूमी –**

पाथर्डी तालुक्यातील शिराळ (चिचोंडी) येथे घराचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्याने कपाटातील हॅण्डपर्समधून तब्बल २ लाख ८२ हजार रुपयांची रोकड लंपास केल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी किशोर एकनाथ वाघ यांनी पाथर्डी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादीनुसार, वाघ हे कुटुंबीयांसह शिराळ येथे राहतात. गावात हरिनाम सप्ताह सुरू असल्याने त्यांच्या घरातील वडील, आई, पत्नी व मुलांसह कीर्तनासाठी गेले होते. दरम्यान, ३१ ऑगस्ट रोजी रात्री सुमारे ८.४५ वाजता वाघ हे कुटुंबीयांना घेण्यासाठी शिराळ गावात गेले होते. कीर्तन आटोपून रात्री सुमारे ९.४६ वाजता ते घरी परतले असता घरासमोरील लाईट बंद असल्याचे तसेच घराचे कुलूप तुटलेले दिसले. घरात प्रवेश करून पाहणी केली असता लोखंडी कपाटाचे कुलूप तोडून कपाटातील सामान अस्ताव्यस्त करण्यात आल्याचे निदर्शनास आले. कपाटाच्या ड्रॉवरमध्ये हॅण्डपर्समध्ये ठेवलेली २ लाख ८२ हजार रुपयांची रोकड गायब असल्याचे आढळून आले. चोरीस गेलेल्या रकमेत ५०० रुपयांच्या ५६४ चलनी नोटांचा समावेश असल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. अज्ञात चोरट्याने घराचे कुलूप तोडून घरात प्रवेश करून ही रोकड चोरून नेल्याची फिर्याद पाथर्डी पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## हरिनाम सप्ताहात मोफत नेत्र तपासणी करुन गरजूंवर मोतिबिंदू शस्त्रक्रिया

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

ग्रामीण भागातील वाडी-वस्तीवरील नागरिकांना आरोग्य सुविधा सहज उपलब्ध व्हाव्यात, या उद्देशाने जिल्हाभर मोफत नेत्र तपासणी शिबिरे राबविणाऱ्या पार्वतीबाई सुखदेव वेताळ सामाजिक विकास संस्थेच्या वतीने आंबेवाडी पावन गणपती (ता. पाथर्डी) येथे अखंड हरिनाम सप्ताहाच्या निमित्ताने मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराला भाविकांसह ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. संस्थेचे हे २६३ वे शिबिर होते. तपासणीदरम्यान मोतिबिंदूची शस्त्रक्रिया आवश्यक असलेल्या गरजू रुग्णांवर पुणे येथे केली जाणार आहे. कै. सुखदेव माधवराव वेताळ यांच्या स्मरणार्थ या आरोग्य उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. धार्मिक कार्यक्रमाच्या निमित्ताने मोठ्या संख्येने नागरिक एकत्र येत असल्याचा फायदा घेत त्यांच्या आरोग्याची तपासणी करण्याचा स्तुत्य उपक्रम संस्थेच्या वतीने राबविण्यात आला. विशेषतः ग्रामीण भागातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल नागरिकांना वेळेत नेत्र तपासणी व उपचार मिळावेत, यासाठी संस्थेच्या माध्यमातून सातत्याने विविध गावांमध्ये शिबिरे घेतली जात आहेत. या शिबिराचे उद्घाटन संस्थेचे अध्यक्ष मेजर शिवाजी वेताळ व सुभेदार मेजर संजय राठोड यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उपस्थित भाविक व ग्रामस्थांची नेत्र तपासणी करण्यात आली. नेत्रविकार असलेल्या रुग्णांना आवश्यक उपचाराबाबत मार्गदर्शन करण्यात आले. तपासणीत मोतिबिंदूची शस्त्रक्रिया आवश्यक असलेल्या रुग्णांची नोंद करून पुढील उपचाराची व्यवस्था करण्यात येणार आहे. डॉ. कोरडे यांनी ग्रामस्थांना आरोग्यविषयक मार्गदर्शन करताना डोळ्यांच्या आरोग्याची काळजी कशी घ्यावी, नेत्रविकारांची लक्षणे कोणती, नियमित नेत्र तपासणीचे महत्त्व काय आहे, याबाबत माहिती दिली. यावेळी मयुर चव्हाण, अनिल चव्हाण, दिलीप राठोड, अंबादास चव्हाण, संजय चव्हाण, विमल चव्हाण, लीलाबाई चव्हाण यांच्यासह ग्रामस्थ व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. धार्मिक कार्यक्रमासोबत सामाजिक व आरोग्यविषयक उपक्रम राबविण्यात आल्याने आंबेवाडी येथील अखंड हरिनाम सप्ताहाला सेवाभावी उपक्रमाची जोड मिळाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उषाताई राठोड यांनी केले. अनिता शिवाजी वेताळ यांनी आभार मानले.

## भोयरेपठार प्राथमिक शाळेतील शिक्षका विरोधात 'खोटे अपंगत्व प्रमाणपत्र' घेतल्याची तक्रार

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

भोयरेपठार येथील प्राथमिक शाळेत कार्यरत असलेल्या एका शिक्षकाने कथितरीत्या खोटे अपंगत्व प्रमाणपत्र मिळविल्याचा आरोप करत, त्याची तातडीने वैद्यकीय तपासणी करून दोष आढळल्यास फौजदारी गुन्हा दाखल करावा आणि सेवेतून बडतर्फ करावे, अशी मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) युवक कार्याध्यक्ष अजय बडोदे यांनी केली आहे. याबाबत त्यांनी अहिल्यानगर पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकाऱ्यांना निवेदन दिले आहे. निवेदनात भोयरेपठार येथील प्राथमिक शाळेत कार्यरत असलेल्या शिक्षकावर आरोप करण्यात आले आहेत. संबंधित शिक्षकाने शिक्षकी पेशातील अध्यापनाचे कर्तव्य बाजूला ठेवून पतसंस्थेच्या कामात तसेच पुढारीपणात वेळ घालवत असल्याचा दावा बडोदे यांनी केला आहे. संबंधित शिक्षकाने स्वतःला अर्धांगवायूचा त्रास असल्याचे दाखवून अपंगत्वाचे प्रमाणपत्र मिळविले असल्याचा आरोप निवेदनातून करण्यात आला आहे. मात्र, प्रत्यक्षात ते धडधाकट असल्याचा दावा करत या अपंगत्व प्रमाणपत्राच्या सत्यतेबाबत शंका उपस्थित करण्यात आली आहे. त्यामुळे संबंधित शिक्षकाची 'इन-कॅमेरा' शारीरिक व वैद्यकीय तपासणी करण्यात यावी, त्यांना किती टक्के अपंगत्व आहे, ते कायमस्वरूपी आहे की तात्पुरते आहे, याची वैद्यकीयदृष्ट्या पडताळणी करण्यात यावी, अशी मागणी बडोदे यांनी केली आहे. अपंगत्व प्रमाणपत्राची अधिकृत वैद्यकीय तपासणी झाल्यास या प्रकरणातील वस्तुस्थिती समोर येईल, असा दावा निवेदनात करण्यात आला आहे. त्यामुळे प्रशासनाने कोणताही विलंब न करता संबंधित शिक्षकाची तपासणी करून अहवालाच्या आधारे योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

# पावसाच्या दीर्घ खंडामुळे शेवगाव तालुक्यात दुष्काळसदृश स्थिती

## ताजनापूर योजनेतून खुटेफळ तलाव भरण्याची स्वाभिमानीची मागणी

**● शेवगाव । वीरभूमी –**

पावसाने दीर्घ खंड घेतल्याने शेवगाव तालुक्यात खरीप पिके, पशुधन व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. शेतकऱ्यांनी मोठा खर्च करून पेरणी केलेली पिके पाण्याअभावी धोक्यात आली असून, तालुक्यात दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर शासनाच्या लागू निकषांनुसार तातडीने उपाययोजना कराव्यात, तसेच ताजनापूर उपसा सिंचन योजना टप्पा क्रमांक एक व दोनमधून उपलब्ध पाणी लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना देऊन खुटेफळ तलाव भरून द्यावा, अशी मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने युवक प्रदेशाध्यक्ष मयूर बोरडे यांच्या नेतृत्वाखाली तहसीलदार आकाश दहाडदे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.



निवेदनात म्हटले आहे की, पावसाळ्याचे तीन महिने उलटूनही समाधानकारक पाऊस न झाल्याने खरीप हंगामातील कापूस, सोयाबीन, तूर, मूग, उडीद आदी पिकांची अवस्था दिवसेंदिवस बिकट होत आहे. पावसाच्या खंडामुळे पिकांना आवश्यक ओलावा मिळत नसल्याने उत्पादनावर मोठा परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे सध्याच्या खरीप पिकांचे तातडीने पंचनामे करून पात्र शेतकऱ्यांना आर्थिक मदत व नुकसानभरपाई द्यावी,

नियमितपणे कर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांवर अन्याय होऊ नये, यासाठी अशा शेतकऱ्यांना सरसकट किमान दोन लाख रुपयांचा प्रोत्साहनपर लाभ देण्यात यावा. तसेच पात्र शेतकऱ्यांचा संपूर्ण कर्जबोजा दूर करून सरसकट कोरा उतारा देण्याची मागणी शासनाकडे पाठवावा. मागील वर्षीच्या कापूस व तूर पिकाचा प्रलंबित पीकविमा शेवगाव तालुक्यातील संबंधित महसूल मंडळांमधील पात्र शेतकऱ्यांना सरसकट मंजूर करून तातडीने वितरित करावा. पीकविमा कंपनी तसेच संबंधित विभागाकडील प्रलंबित प्रकरणांचा तातडीने निपटारा करावा.

ताजनापूर उपसा सिंचन योजना टप्पा क्रमांक दोनचे पाणी तातडीने लाभक्षेत्रात सोडावे. विशेषतः घोटण व परिसरातील शेतकऱ्यांना पूर्ण दाबाने पाणी उपलब्ध करून द्यावे. तसेच ताजनापूर उपसा सिंचन योजना टप्पा क्रमांक एकमधील दोन्ही पाइपलाइन पूर्ण क्षमतेने सुरू करून तळणी व परिसरातील लाभधारक शेतकऱ्यांना पाणी द्यावे. खुटेफळ तलाव तातडीने पाण्याने भरून दिल्यास शेतीसह पिण्याचे पाणी, पशुधन व भूजलपातळीला मोठा फायदा होईल. पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झालेल्या गावांमध्ये तसेच वाड्या-वस्त्यांवर तातडीने पाणी टँकर सुरू करावेत. पशुधन वाचविण्यासाठी आवश्यक त्या ठिकाणी चारा डेपो सुरू करून जनावरांसाठी पुरेसा चारा उपलब्ध करून द्यावा. उपलब्ध पाण्याचा योग्य वापर करून नदी, नाले, तलाव व बंधारे भरून देण्याचे नियोजन करावे. महसूल, कृषी, पशुसंवर्धन व जलसंपदा विभागासह स्वाभिमानी शेतकरी संघटना व शेतकरी प्रतिनिधींची तातडीने संयुक्त बैठक घेऊन गावनिहाय कृती आराखडा निश्चित करावा, अशी मागणी संघटनेने केली आहे.

यावेळी संघटनेचे जिल्हाध्यक्ष रावसाहेब लवांडे, बाळासाहेब फटांगडे, जिल्हा उपाध्यक्ष दत्तात्रय फुंदे, मच्छिंद्र आर्ले, संतोष गायकवाड, बाळासाहेब गर्जे, अशोक भोसले , अमोल देवढे, बाबुराव सय्यद यांच्यासह पदाधिकारी व शेतकरी उपस्थित होते.

### प्रशासनाने कार्यवाही न केल्यास तीव्र आंदोलन

■ या सर्व मागण्यांची तातडीने दखल घेऊन शेतकरी, पशुधन व ग्रामीण जनतेला दिलासा द्यावा. प्रशासनाने तातडीने कार्यवाही न केल्यास शेतकऱ्यांना सोबत घेऊन लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे युवक प्रदेशाध्यक्ष मयूर बोरडे यांच्यासह इतर पदाधिकाऱ्यांनी दिला आहे.

## डिग्री नव्हे, कौशल्य हवे; नोकरी नव्हे, कर्तृत्व हवे : प्रा. कानिफ उगले

### सोनिया गांधी तंत्रनिकेतनच्या ई अँड टीसी विभागाचा प्रवेशोन्मुख कार्यक्रम उत्साहात

**● श्रीगोंदा । वीरभूमी –**

डिप्लोमा अभियांत्रिकीची तीन वर्षे केवळ पदवी मिळविण्यासाठी न घालवता ज्ञान, कौशल्य, आत्मविश्वास आणि व्यक्तिमत्त्व विकासासाठी वापरा. शिक्षणाचा उद्देश केवळ डिग्री मिळविणे नसून स्वतःची क्षमता सिद्ध करणे आहे, असे प्रतिपादन प्रा. कानिफ उगले यांनी केले.



सोनिया गांधी तंत्रनिकेतन, श्रीगोंदा येथील इलेक्ट्रॉनिक्स व टेलिकम्युनिकेशन विभागाच्या प्रवेशोन्मुख कार्यक्रमात विद्यार्थ्यांशी संवाद साधताना ते बोलत होते. त्यांनी अभियांत्रिकी शिक्षण, आधुनिक तंत्रज्ञान, करिअर, महाविद्यालयीन जीवन, मैत्री आणि ध्येय याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

पुढे बोलााना श्री. उगले म्हणाले की 'करिअर अंतिम वर्षात सुरू करू नका; ते पहिल्या वर्षापासून घडवा,' असा संदेश देत त्यांनी तांत्रिक कौशल्यासोबत संवादकौशल्य, प्रत्यक्ष प्रकल्प आणि आधुनिक तंत्रज्ञान आत्मसात करण्याचे आवाहन केले. चांद्रयान-२ ते चांद्रयान-३चा प्रवास तसेच डॉ. एस. सोमनाथ आणि डॉ. टेसी थॉमस यांच्या कार्याची उदाहरणे देत अपयशातून शिकण्याचे व सातत्याने प्रयत्न करण्याचे महत्त्व त्यांनी स्पष्ट केले. ई अँड टीसी ही इलेक्ट्रॉनिक्स, संदेशवहन, संगणकीय तंत्रज्ञान आणि आधुनिक तंत्रज्ञानाला जोडणारी महत्त्वाची शाखा असल्याचेही त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. प्रविण बावधनकर यांनी केले. प्राचार्य डॉ. अमोल नागवडे, विभागप्रमुख प्रा. प्रविण बाबर यांच्यासह प्राध्यापक उपस्थित होते. सूत्रसंचालन विद्यार्थी सोमनाथ गायकवाड, समिक्षा आमले, गायत्री कांडेकर व अनुष्का खळदकर यांनी केले. आभार विभागप्रमुख प्रा. विक्रम शिंदे यांनी मानले.

## पावसाअभावी तोंडोळी परिसरात पाणीटंचाई; पिके व पशुधन संकटात

### तातडीने टँकर, चारा व पीक नुकसानभरपाई देण्याची मागणी

**● पाथर्डी । वीरभूमी –**

पावसाने ओढ दिल्याने तोंडोळी व परिसरात पाणीटंचाईचे गंभीर संकट निर्माण झाले आहे. विहिरी, बोअरवेल, तलाव व बंधाऱ्यांमध्ये पाणीसाठा अत्यल्प राहिल्याने ग्रामस्थांसह पशुधनाच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. याबाबत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (ओबीसी सेल)चे तालुकाध्यक्ष नानाभाऊ पडळकर यांनी तहसीलदारांकडे निवेदन देऊन तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली.



पावसाअभावी कापूस, तूर, उडीद, मूग यांसह खरीप पिकांचे मोठे नुकसान होण्याची शक्यता असून, शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेले पीक वाया जाण्याची भीती आहे. त्यामुळे पिकांचे तातडीने पंचनामे करून नुकसानभरपाई देण्याची मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

तोंडोळी व परिसरातील पाणीटंचाईग्रस्त भागात तातडीने पिण्याच्या पाण्याचे टँकर सुरू करावेत, पशुधनासाठी स्वतंत्र पाण्याची व्यवस्था करावी, उपलब्ध जलस्रोतांची पाहणी करून पाणी नियोजन करावे, तसेच जनावरांसाठी चारा उपलब्ध करून देण्याबाबत निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. पशुधनासाठी पशुवैद्यकीय तपासणी व औषधोपचाराचीही व्यवस्था करण्याची मागणी आहे.

पाणीटंचाईची प्रत्यक्ष पाहणी करून नागरिक, पशुधन व शेतकऱ्यांना तातडीने दिलासा द्यावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. निवेदनाच्या प्रती जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, गटविकास अधिकारी, तालुका कृषी अधिकारी व पशुधन विकास अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत. या निवेदनावर सतिष वारंगुळे, नंदु वारंगुळे यांच्यासह ग्रामस्थांच्या सह्या आहेत.

## पेडगाव येथील ऐतिहासिक धर्मवीर गडासाठी ५ कोटींचा निधी मंजूर!

### छत्रपती संभाजी महाराज स्मारकासह जतन-दुरुस्तीला मिळणार गती । विखे-पाचपुते यांच्या पाठपुराव्याला यश

**● श्रीगोंदा । वीरभूमी –**

पेडगाव येथील ऐतिहासिक धर्मवीर गडाच्या संवर्धनासाठी तब्बल पाच कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. छत्रपती संभाजी महाराजांचे स्मारक तसेच गडावरील जतन व दुरुस्तीच्या कामांसाठी हा निधी उपलब्ध होणार असून, महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालय संचालनालयाने यास प्रशासकीय मान्यता दिली आहे.

राज्याचे जलसंपदा मंत्री तथा अहिल्यानगरचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील आणि श्रीगोंदा मतदारसंघाचे आमदार विक्रमसिंह पाचपुते यांनी धर्मवीर गडाच्या संवर्धनासाठी शासनस्तरावर सातत्याने पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नांना अखेर यश आले आहे. पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालय संचालनालयाने १२ ऑगस्ट २०२६ रोजी जारी केलेल्या आदेशानुसार जिल्हा नियोजन समिती, नाशिक अंतर्गत उपलब्ध निधीतून धर्मवीर गडावरील कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर प्रत्यक्ष कामाला सुरुवात होणार आहे.

छत्रपती संभाजी महाराजांच्या इतिहासाशी धर्मवीर गडाचे अतूट नाते आहे. संगमेश्वर येथे पकडल्यानंतर महाराजांना पेडगाव परिसरात आणण्यात आल्याचे ऐतिहासिक संदर्भ आहेत. त्यामुळे धर्मवीर गड हा छत्रपती संभाजी महाराजांच्या शौर्य, स्वाभिमान आणि बलिदानाच्या स्मृती जपणारा महत्त्वपूर्ण ऐतिहासिक वारसा मानला जातो.

गडाच्या जतन-दुरुस्तीमुळे ऐतिहासिक वास्तू व अवशेषांचे संवर्धन होण्यास मदत होणार असून, प्रस्तावित स्मारकामुळे या परिसराला नवी ऐतिहासिक ओळख मिळण्याची अपेक्षा आहे. धर्मवीर गडाच्या संवर्धनासाठी मंजूर झालेला निधी हा केवळ विकासकामांचा टप्पा नसून महाराष्ट्राच्या इतिहासाच्या जतनाच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे. भविष्यात व्यापक विकास आराखड्याच्या




माध्यमातून गडाला ऐतिहासिक व पर्यटनदृष्ट्या महत्त्वाचे केंद्र बनविण्याच्या प्रयत्नांना यामुळे बळ मिळणार आहे.

छत्रपती संभाजी महाराजांच्या शौर्य आणि बलिदानाची साक्ष देणाऱ्या धर्मवीर गडाच्या संवर्धनाला आता प्रत्यक्ष सुरुवात होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

# उर्दू शाळेच्या सहा खोल्यांसाठी आ. आशुतोष काळेंकडून ३० लाखांचा निधी

## नगरसेवक हाजी मेहमूद सय्यद यांनी सहकाऱ्यांसमवेत होणाऱ्या वर्गखोल्यांच्या जागेची पाहणी । लवकरच काम सुरु होणार

**● कोपरगाव । वीरभूमी –**

कोपरगाव उर्दू हायस्कूलमधील विद्यार्थ्यांची वर्गखोल्यांची समस्या कायमची दूर करण्यासाठी आ.आशुतोष काळे यांनी उपलब्ध करून दिलेल्या ३० लाख रुपयांच्या निधीतून सहा नवीन वर्गखोल्या व शिक्षकांसाठी स्टाफ रूमचे बांधकाम लवकरच सुरु होणार असून राष्ट्रवादी काँग्रेसचे नगरसेवक हाजी मेहमूद सय्यद यांनी सहकाऱ्यांसमवेत होणाऱ्या वर्गखोल्यांच्या जागेची पाहणी केली.

उर्दू हायस्कूलमध्ये वर्गखोल्यांची कमतरता असल्याने विद्यार्थी व शिक्षकांना अडचणींचा सामना करावा लागत होता. ही समस्या लक्षात घेऊन आ.आशुतोष काळे यांनी निधी उपलब्ध करून दिल्याने आता विद्यार्थ्यांना प्रशस्त वर्गखोल्या आणि अधिक चांगल्या शैक्षणिक सुविधा मिळणार आहेत. नवीन वर्गखोल्यांमुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीला चालना मिळणार आहे त्याबद्दल मुस्लीम समाज बांधवांनी समाधान व्यक्त केले. यावेळी नगरसेवक हाजी मेहमूद सय्यद म्हणाले की, शिक्षणाच्या पायाभूत सुविधांना प्राधान्य देण्याची काळे परिवाराची परंपरा यामुळे पुन्हा अधोरेखित झाली आहे. यापूर्वी स्व. कर्मवीर शंकररावजी काळे यांनीही उर्दू हायस्कूलच्या वर्गखोल्यांसाठी निधी उपलब्ध करून दिला होता. तसेच माजी आमदार अशोकराव काळे यांनी देखील मुस्लिम समाजाच्या मागणीनुसार वेळोवेळी निधी दिला होता. ही परंपरा आमदार आशुतोष काळे पुढे चालवत आहेत.

त्यांनी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य उज्वल करण्यासाठी आवश्यक सुविधा निर्माण करण्याच्या केलेल्या प्रयत्नांचे पालक व नागरिकांकडून स्वागत होत आहे. आजच्या स्पर्धात्मक युगात शिक्षणाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. विद्यार्थ्यांनी उपलब्ध होणाऱ्या या सुविधांचा उपयोग करून मनापासून अभ्यास करावा, उच्च शिक्षण घ्यावे आणि आपल्या आई-वडिलांसह कोपरगावचे नाव उज्ज्वल करावे. आ. आशुतोष काळे यांनी कोपरगाव मतदार संघातील मदरसा, कब्रस्तान, संरक्षण भिंत, कब्रस्तान सुशोभीकरण आणि नवीन कब्रस्तान यांसह मुस्लिम समाजाच्या विविध मूलभूत प्रश्नांकडेही गांभीर्याने लक्ष देऊन निधी उपलब्ध करून दिला आहे. अनेक प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी त्यांनी केलेल्या प्रयत्नांबद्दल मुस्लिम समाजाच्या वतीने त्यांनी आ.आशुतोष काळे यांचे आभार मानले व यापुढेही मुस्लिम समाज



आमदार आशुतोष काळे यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहणार असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी मुस्लिम समाजबांधव, शिक्षक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते, उपस्थित होते.

# एमपीएससी औषध निरीक्षक परीक्षा पेपरफुटीची सखोल चौकशी करा

## दोषींवर कठोर कारवाईसह गैरप्रकारातून झालेल्या निवडी रद्द करण्याची राष्ट्रवादी काँग्रेसची मागणी

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या औषध निरीक्षक गट-ब परीक्षेतील कथित पेपरफुटी प्रकरणाची निष्पक्ष व सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, तसेच गैरप्रकाराचा लाभ घेऊन निवड झाल्याचे सिद्ध झाल्यास संबंधित निवडी रद्द कराव्यात, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनातून करण्यात आली.



स्पर्धा परीक्षांची तयारी करणारे लाखो विद्यार्थी गरीब व मध्यमवर्गीय कुटुंबांतील असून, आई-वडिलांच्या कष्टाच्या पैशातून वर्षानुवर्षे अभ्यास करून अधिकारी होण्याचे स्वप्न पाहतात. मात्र पैसे देऊन प्रश्नपत्रिका मिळवून गैरप्रकाराचा फायदा घेता येत असेल, तर प्रामाणिकपणे अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांनी मेहनत का करावी, असा गंभीर प्रश्न या घटनेमुळे निर्माण झाला आहे. अशा प्रकारांमुळे विद्यार्थ्यांमध्ये मानसिक ताण, निराशा आणि असुरक्षिततेची भावना निर्माण होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले.

विद्यार्थ्यांना उपकार नकोत, न्याय हवा; अधिकारी होण्याचा मार्ग पैशाचा नव्हे, तर ज्ञान, गुणवत्ता आणि प्रामाणिक मेहनतीचा असला पाहिजे, अशी भूमिका पक्षाच्या वतीने मांडण्यात आली. पेपरफुटीमागील संपूर्ण साखळी, त्यामागील आर्थिक व्यवहार आणि संबंधित व्यक्तींची भूमिका यांचा तपास करून दोषींवर कठोरात कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली.

यापूर्वीही स्पर्धा परीक्षांमधील गैरप्रकारांमुळे विद्यार्थ्यांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे. परीक्षा व्यवस्थेत पारदर्शकता आणि विश्वास निर्माण करण्यासाठी शासनाने ठोस उपाययोजना करणे आवश्यक असताना पुन्हा पेपरफुटीचे प्रकरण समोर येणे ही अत्यंत गंभीर व संतापजनक बाब असल्याचे निवेदनात म्हटले आहे. एका परीक्षेतील गैरप्रकारामुळे गरीब व होतकरू विद्यार्थ्यांचे भविष्य अंधारात जाऊ नये, ही शासनाची जबाबदारी असल्याचेही पक्षाने स्पष्ट केले.

या मागणीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या अहिल्यानगर जिल्ह्याच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. जिल्हाध्यक्ष सीताराम काकडे व युवक उपजिल्हाध्यक्ष प्रकाश पोटे यांच्या मार्गदर्शनाखाली निवेदन देण्यात आले यावेळी युवक जिल्हाध्यक्ष रामेश्वर निमसे, नगर तालुका अध्यक्ष शरद पवार, नामदेव पवार, महिला शहराध्यक्ष अर्चना गायकवाड, फारुख रंगरेज, समीर पठाण, अजर शेख, रामदास ससे, चंद्रकांत पवार, राम झिने, आकाश निमसे, महेश पवार यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# SPOT NEWS

## आठरवाडी येथे जोरदार भांडण; तीन जणांवर गुन्हा दाखल

**● पाथर्डी । वीरभूमी –**

तालुक्यातील माणिकदौंडी परिसरातील आठरवाडी येथे सार्वजनिक ठिकाणी झालेल्या आपापसांतील वादातून जोरदार हाणामारी झाल्याची घटना २५ ऑगस्ट रोजी घडली. या धुमश्चक्रीत एकाच्या हाताला फ्रॅक्चर झाले आहे. घटनास्थळी पोलिस दाखल झाल्यानंतर तेथुन एक बिगर मॅगझिनचे गावठी पिस्तूल, लोखंडी रॉड व एक मोटारसायकल हस्तगत केला आहे. या प्रकरणी पाथर्डी पोलिसांनी उमेश अनिल आव्हाड (वय २२) व आदिनाथ लहाणू जावळे (वय ३१, दोघे रा. रांजणी, ता. पाथर्डी) व पोपट ज्ञानदेव बडे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २५ ऑगस्ट रोजी दुपारी अडीच ते चार वाजण्याच्या दरम्यान आठरवाडी येथे सार्वजनिक ठिकाणी पोपट ज्ञानदेव बडे (रा. आठरवाडी), उमेश आव्हाड व आदिनाथ जावळे यांच्यात वाद सुरू असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी जाऊन परिस्थिती नियंत्रणात आणली. यावेळी गावातील नागरिकांनी उमेश आव्हाड व आदिनाथ जावळे यांना पकडून ठेवले होते. वादादरम्यान मारहाण झाल्याने पोपट बडे यांच्या हाताला दुखापत होऊन फ्रॅक्चर झाल्याचे तक्रारीत नमूद आहे. घटनेच्या ठिकाणी पोलिसांना पिस्तूलसदृश हत्यार, स्टीलचा पाईप व मोटारसायकल आढळून आली. पंचासमक्ष केलेल्या पंचनाम्यात पोलिसांनी एक ५४.५ सेंटीमीटर लांबीचा स्टीलचा गोलाकार पाईप, अंदाजे १५ हजार रुपये किमतीचे पिस्तूलसदृश हत्यार आणि अंदाजे २० हजार रुपये किमतीची हिरो एच.एफ. डिलक्स मोटारसायकल जप्त केल्याचे नोंदविले आहे. या घटनेप्रकरणी पोलिस शिपाई विनोद शिवाजी मासाळकर यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पाथर्डी पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहितेतील कलम १९४, ११८(२) तसेच शस्त्र कायदा कलम ३/२५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रकरणाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक निवृत्ती आगरकर करीत आहेत.

## कोटीत विकला जातो'च्या अफवेतील मांडूळ शेतात खुरपणी करताना आढळला

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

'मांडूळ साप लाखो-कोटी रुपयांना विकला जातो', अशा अफवांमुळे नेहमीच चर्चेत असलेला चार ते पाच किलो वजनाचा मांडूळ साप शहापूर-कर्डीले पंपासमोरील शेतात आढळून आल्याने परिसरात काही काळ खळबळ उडाली. सकाळच्या सुमारास शेतात खुरपणीचे काम सुरू असताना शेतकऱ्यांच्या निदर्शनास हा साप आला.अचानक साप दिसल्याने घाबरलेल्या शेतकऱ्यांनी तातडीने सर्पमित्र कृष्णा पाटील बेरड यांच्याशी संपर्क साधला. माहिती मिळताच घटनास्थळी दाखल झालेल्या पाटील यांनी कोणतीही इजा न करता मांडूळ सापाला सुरक्षितपणे पकडले. त्यानंतर त्याला योग्य नैसर्गिक अधिवासात सुरक्षितपणे मुक्त करण्यात आले. यावेळी आनंद दळवी, प्रवीण लाटणे, पवन दारांगे, अथर्व पुंड आदी उपस्थित होते. अफवांवर विश्वास ठेवू नका : मांडूळ सापाबाबत समाजात अनेक वर्षांपासून विविध गैरसमज व आर्थिक व्यवहाराच्या अफवा पसरलेल्या आहेत. मात्र, अशा अफवांवर विश्वास ठेवून साप पकडणे, त्याला इजा करणे किंवा त्याची विक्री करण्याचा प्रयत्न करणे धोकादायक तसेच कायद्याच्या कचाट्यात आणणारे ठरू शकते. साप आढळल्यास नागरिकांनी घाबरून जाऊ नये, त्याला मारू नये किंवा स्वतः पकडण्याचा प्रयत्न करू नये. सापाला सुरक्षित अंतरावर ठेवून सर्पमित्र किंवा वनविभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन सर्पमित्र कृष्णा पाटील बेरड यांनी केले.

## पुणे विभागामध्ये पिंपळगावरोठा पोस्टचा तिसरा क्रमांक व जिल्ह्यात प्रथम क्रमांक

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

पिंपळगाव रोठा येथील शाखा डाक कार्यालयाचे पोस्टमास्तर ऋषिकेश फड यांनी पुणे विभागामध्ये पिंपळगाव रोठा पोस्ट मास्तर चा तिसरा क्रमांक आणि अहिल्यानगर जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळवला याबद्दल पिंपळगाव रोठा ग्रामस्थांच्या वतीने ग्रामस्थ, शेतकरी, विद्यार्थी, पालक, मुंबईकर मंडळी यांच्या वतीने ॲड. पांडुरंग गायकवाड श्री. फड यांचा सत्कार करण्यात आला. ते तीन वर्षांपूर्वी पिंपळगाव रोठा येथे सेवेला रुजू होऊन प्रथमच सेवा प्रारंभ केला होता.ग्रामीण भागातील या शाखा डाक कार्यालयाचा कारभार पिंपळगाव रोठा,कारेगाव व अक्कलवाडी या गावांच्या करिता आहे. सेवा आरंभ झाल्यापासून तीन वर्षाच्या कार्यकाळात पोस्टमास्तर ऋषिकेश सोपान फड यांनी सदर तीन गावांचा जनतेसी सतत संपर्क साधून पोस्ट विभागातर्फे असलेल्या शासनाच्या योजनांची,सवलतींची, आर्थिक सुरक्षिततेची माहिती शेतकरी, शेतमजूर, ग्रामस्थांना समजावून जनतेमध्ये त्या योजना बद्दल गाव पातळीवर जागृती निर्माण केली. पोस्टाद्वारे आर्थिक व्यवहार व गुंतवणूक करावयाचे फायदे आणि सुरक्षिततेची खात्री देत ग्रामीण जनतेचा विश्वास संपादन करीत अखंड कर्तव्य करीत राहिले.

# छत्रपती कॉलेजमध्ये जिल्हास्तरीय 'करिअर मॅपिंग' कार्यशाळा उत्साहात

## जिल्ह्यातील समन्वयक व 'करिअर संसद' विद्यार्थ्यांचा सहभाग

**● श्रीगोंदा । वीरभूमी –**

विद्यार्थ्यांच्या आवडी, क्षमता, एआय कौशल्ये आणि भविष्यातील रोजगाराच्या संधी लक्षात घेऊन त्यांना योग्य करिअरची दिशा मिळावी, या उद्देशाने महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने अहिल्यानगर जिल्हास्तरीय 'करिअर मॅपिंग' एकदिवसीय कार्यशाळा श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय, श्रीगोंदा येथे उत्साहात संपन्न झाली.



कार्यशाळेचे उद्घाटन युवा नेते दिग्विजय राजेंद्रदादा नागवडे यांच्या प्रमुख उपस्थितीत, तर अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रवर्तक डॉ. सतीशचंद्रजी सूर्यवंशी होते. यावेळी विश्वस्त प्रा. सुरेश रसाळ यांच्यासह जिल्ह्यातील समन्वयक, प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

युवा नेते दिग्विजय नागवडे यांनी विद्यार्थ्यांनी योग्य करिअर मॅपिंग, सातत्यपूर्ण प्रयत्न आणि प्रामाणिक कष्ट यांच्या बळावर ध्येय साध्य करावे, असे आवाहन केले. प्राचार्य डॉ. सूर्यवंशी यांनी कार्यशाळेचा उद्देश स्पष्ट करत विद्यार्थ्यांना त्यांच्या क्षमता व आवडीनुसार करिअर निवडीसाठी अशा उपक्रमांची आवश्यकता असल्याचे सांगितले.

महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्राचे अध्यक्ष यशवंत शितोळे यांनी करिअरच्या विविध संधी, कौशल्य विकास व स्पर्धात्मक परीक्षांबाबत मार्गदर्शन केले. तर भूषण कोळेकर, माजी सहाय्यक महाव्यवस्थापक, स्टेट बँक ऑफ इंडिया यांनी बँकिंग, व्यवसाय, रोजगार व स्पर्धात्मक परीक्षांच्या संधींबाबत विद्यार्थ्यांना माहिती दिली.

विद्यार्थी प्रतिनिधींनीही कार्यशाळेतून मिळालेल्या मार्गदर्शनाबाबत मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जिल्हा समन्वयक डॉ. विलास सुद्रिक यांनी केले, तर जिल्हा समन्वयक किशोर गायकवाड यांनी आभार मानले.

कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनासाठी छत्रपती कॉलेजमधील 'करिअर संसद' विद्यार्थ्यांनी विशेष मेहनत घेतली. संस्थेचे अध्यक्ष राजेंद्रदादा नागवडे, उपाध्यक्ष सौ. मेघाताई संदीप औटी, जिल्हा बँक संचालिका सौ. अनुराधाताई नागवडे, सर्व विश्वस्त, निरीक्षक सचिनराव लगड व सेवकांनी आयोजकांचे अभिनंदन केले.

# पारनेरच्या मतदारसंघात ३८,९०७ मतदारांची नावे वगळली; मतदारसंख्येत घट

## प्रारूप यादीत ३१९६०९ मतदार । ३० सप्टेंबरपर्यंत हरकती नोंदवा

**● पारनेर । वीरभूमी–**

भारत निवडणूक आयोगाच्या विशेष मतदार यादी पुनरिक्षण कार्यक्रमांतर्गत २२४ पारनेर विधानसभा मतदारसंघातील प्रारूप मतदार यादी ३१ ऑगस्ट रोजी प्रत्येक मतदान केंद्रावर प्रसिद्ध करण्यात आली. या पुनरिक्षण प्रक्रियेत मयत, दुबार, अढळ न होणारे तसेच स्थलांतरित अशा विविध कारणांमुळे तब्बल ३८ हजार ९०७ मतदारांची नावे मतदार यादीतून वगळण्यात आली आहेत. त्यामुळे पारनेर मतदारसंघातील मतदारसंख्येत मोठी घट झाली आहे.



या संदर्भात आज, १ सप्टेंबर रोजी आयोजित पत्रकार परिषदेत मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, श्रीगोंदा-पारनेर उपविभाग, श्रीकुमार चिंचकर आणि सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी तथा तहसीलदार पारनेर गायत्री सौंदाणे यांनी विशेष पुनरिक्षण कार्यक्रमांतर्गत करण्यात आलेल्या कामकाजाची सविस्तर माहिती दिली.

विशेष पुनरिक्षणानंतर प्रसिद्ध करण्यात आलेल्या प्रारूप मतदार यादीत आता एकूण ३ लाख १९ हजार ६०९ मतदारांचा समावेश आहे. मतदार यादी शुद्धीकरणाच्या प्रक्रियेत विविध कारणांमुळे अपात्र अथवा उपलब्ध न होणाऱ्या मतदारांच्या नोंदींची पडताळणी करून त्यानुसार नावे वगळण्यात आली आहेत.

दरम्यान, प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध झाल्याने मतदारांनी आपले नाव यादीत आहे किंवा नाही, याची तातडीने खातरजमा करण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे. संबंधित मतदान केंद्रावर प्रत्यक्ष यादी तपासण्याबरोबरच भारत निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळावरून मतदार यादी डाऊनलोड करूनही नावाची पडताळणी करता येणार आहे.

नाव वगळले असल्यास किंवा समावेशनाबाबत आक्षेप असल्यास ३० सप्टेंबरपर्यंत हरकत नोंदविता येणार आहे. त्यामुळे मतदारांनी प्रारूप मतदार यादी तपासून आपले नाव योग्यरीत्या समाविष्ट आहे की नाही, याची खातरजमा करावी. नाव वगळल्याचे आढळल्यास अथवा यादीतील नोंदीबाबत काही आक्षेप असल्यास विहित मुदतीत आवश्यक कागदपत्रांसह हरकत दाखल करावी, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

# शहापूर ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी काळे गटाच्या सौ. कविता घारे बिनविरोध

**● कोपरगाव । वीरभूमी –**

तालुक्यातील शहापूर ग्रामपंचायतीचे विद्यमान उपसरपंच सौ. निशा खंडीझोड यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्यामुळे रिक्त झालेल्या उपसरपंचपदी काळे गटाच्या सौ. कविता अंकुश घारे यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे.

शहापूर ग्रामपंचायतीच्या रिक्त असलेल्या उपसरपंच पदासाठीची निवडणूक प्रक्रिया नुकतीच सरपंच सौ. योगिता डांगे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी उपसरपंचपदासाठी निर्धारित वेळेत सौ. कविता घारे यांचा एकमेव अर्ज प्राप्त झाल्यामुळे निवडणूक अधिकारी म्हणून काम पाहत असलेले ग्रामसेवक शिवाजी सोमवंशी यांनी सौ. कविता घारे यांची बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर केले.

यावेळी सरपंच, सर्व सदस्य, काळे गटाचे कार्यकर्ते व कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याचे माजी. व्हा. चेअरमन प्रवीण शिंदे यांनी नवनिर्वाचित उपसरपंच सौ. कविता घारे यांचा सत्कार करून त्यांना शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी सरपंच सौ. योगिता डांगे, मावळत्या उपसरपंच सौ. निशा खंडीझोड, सर्व ग्रा.प.सदस्य, सागर घारे, रामनाथ घारे, राजेंद्र पाचोरे, रमेश डांगे, वसंत पाचोरे, जनार्दन पाचोरे, अशोक डांगे, गणेश घारे, पोपट घारे, वाल्मिक घारे, गोविंद पाचोरे, अंकुश घारे, नवनाथ डांगे, सुनीता डांगे आदी मान्यवरांसह काळे गटाचे कार्यकर्ते व शहापूर ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



नवनिर्वाचित उपसरपंच सौ. कविता घारे यांची मा. आ. अशोकराव काळे व आ. आशुतोष काळे यांनी अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. उपसरपंचपदी काम करण्याची संधी दिल्याबद्दल नवनिर्वाचित उपसरपंच सौ. कविता घारे यांनी आ. आशुतोष काळे यांचे आभार मानले. ज्या विश्वासाने माझ्यावर उपसरपंचपदाची जबाबदारी सोपविली त्या विश्वासाला तडा जावू न देता सरपंच, सर्व सदस्य यांच्या सहकार्यातून शहापूर ग्रामस्थांना अपेक्षित असलेला विकास करून दाखवेल व टाकलेला विश्वास सार्थ ठरवणार असल्याचे त्यांनी सांगितले आहे.

# निघोज येथे मळगंगा देवीचा खैराडी पालखी उत्सव उत्साहात

## तिसऱ्या श्रावणी मंगळवारी भक्तांचा उत्स्फूर्त सहभाग । जयघोषाने परिसर दुमदुमला

**● निघोज । वीरभूमी –**

तिसऱ्या श्रावणी मंगळवारनिमित्त मळगंगा देवीचा खैराडी पालखी उत्सव मोठ्या थाटामाटात व भक्तिभावात पार पडला. मळगंगा देवीच्या जयजयकाराने परिसर दुमदुमून गेला.

दरवर्षी श्रावणातील तिसऱ्या मंगळवारी खैराडी येथील मळगंगा देवीचा यात्रा उत्सव मोठ्या भक्तिभावाने साजरा केला जातो. सकाळी नऊ वाजता राज्यातील जागृत देवस्थान म्हणून प्रसिद्ध असलेल्या निघोज येथील मळगंगा देवी मंदिरातून पालखीची वाजतगाजत मिरवणूक काढण्यात आली. ग्रामपंचायत चौक, नवी पेठ, एसटी बसस्थानक मार्गे पिंपरी जलसेन रस्त्यावरून निघोजपासून सुमारे तीन किलोमीटर अंतरावर असलेल्या खैराडी येथील मळगंगा मंदिरात पालखी सोहळा पोहोचला.

खैराडी येथील मंदिरात पालखीचे आगमन झाल्यानंतर पूजा-अर्चा व महाआरती करण्यात आली. कवाद वस्ती आणि खैराडी ग्रामस्थांच्या वतीने भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. निघोजचे माजी सरपंच व ज्येष्ठ कारभारी राजारामशेठ कवाद आणि त्यांचे सहकारी गेल्या अनेक वर्षांपासून येथे महाप्रसादाचे आयोजन करीत आहेत.

फटाक्यांची आतषबाजी, भंडाऱ्याची उधळण आणि मळगंगा देवीच्या जयघोषात पालखीचे स्वागत करण्यात आले. पिंपरी जलसेन रस्त्यावरील कवाद व लंके वस्तीवरील मळगंगा देवी मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती. प्रत्येक घरासमोर रांगोळी काढून व सडा टाकून महिलांनी पालखीचे भक्तिभावाने स्वागत केले. महिलांनी देवीचे औक्षण करून आरती ओवाळली. पालखीपुढे चालणाऱ्या भाविकांच्या पायावर पाणी टाकून त्यांचेही स्वागत करण्यात आले.

शेकडो महिलांनी पालखीतील चांदीच्या मूर्तीचे औक्षण करून देवीचे दर्शन घेतले. त्यानंतर पालखी सोहळा वाजतगाजत मिरवणुकीने पुन्हा निघोज येथील मंदिरात आणण्यात आला. मंदिरात सत्यनारायण महापूजा झाल्यानंतर कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

मळगंगा देवीच्या जयजयकाराने संपूर्ण परिसर निनादून गेला होता. दिवसभर निघोज तसेच खैराडी येथील मळगंगा मंदिरात दर्शनासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती.



### श्रावणातील दररोज देवीचे ऑनलाइन दर्शन

देवीचे पुजारी सुनील गायखे व त्यांच्या कुटुंबीयांकडून प्रत्येक श्रावणी मंगळवारी देवीची चांदीची मूर्ती साडी व आकर्षक फुलांनी सजविली जाते. तसेच श्रावणातील प्रत्येक दिवशी पहाटेची पूजा व सकाळची श्रावणी पूजा करून देवीचे छायाचित्र सोशल मीडियाच्या माध्यमातून भाविकांपर्यंत पोहोचविण्यात येते. त्यामुळे राज्यातील लाखो भाविकांना दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून देवीचे दर्शन घेता येत असून, भाविकांनी समाधान व्यक्त केले आहे.

वीरभूमी
हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक- महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर-४१४१०६ येथे प्रसिद्ध केले.
* संपादक- महादेव दळे, पत्ता- कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

# कुकडीच्या पाण्यासाठी वर्षानुवर्षे झगडणाऱ्या शेतकऱ्यांना अखेर दिलासा!

## डिंभे-माणिकडोह बोगद्याला राज्य सरकारची मंजुरी । ५,७०४.५० कोटींच्या कुकडी प्रकल्पालाही हिरवा कंदील

■ **विजय उंडे**

● **श्रीगोंदा । वीरभूमी** –
कधी कालव्याकडे डोळे लावून बसलेला शेतकरी, तर कधी आवर्तनासाठी प्रशासनाच्या दारात हेलपाटे मारणारा बळीराजा... कधी आंदोलन, तर कधी पाण्यासाठी तीव्र संघर्ष- कुकडीच्या लाभक्षेत्रातील श्रीगोंदा, कर्जत आणि करमाळा तालुक्यांतील शेतकऱ्यांच्या या प्रदीर्घ प्रतीक्षेला आता निर्णायक वळण मिळाले आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून रखडलेल्या डिंभे-माणिकडोह बोगद्याला राज्य मंत्रिमंडळाने मंजुरी दिली असून, पुणे जिल्ह्यातील कुकडी पाटबंधारे प्रकल्पाच्या ५ हजार ७०४ कोटी ५० लाख रुपयांच्या सुधारित खर्चालाही मान्यता देण्यात आली आहे. या निर्णयामुळे कुकडीच्या डाव्या कालव्याच्या लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांच्या सिंचनाचा प्रश्न अधिक भक्कम होण्याची अपेक्षा आहे.

कुकडीचे पाणी म्हणजे या भागातील शेतकऱ्यांसाठी केवळ सिंचनाचे साधन नाही; ते शेतातील उभ्या पिकांचा, कुटुंबाच्या उदरनिर्वाहाचा आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेचा आधार आहे. मात्र अनेकदा आवर्तन लांबल्याने पिके करपण्याची वेळ आली. उन्हाळ्यात पाण्याची प्रतीक्षा आणि पावसाळ्यात उपलब्ध होणारे अतिरिक्त पाणी वाहून जाण्याची विसंगती या भागातील शेतकऱ्यांनी वर्षानुवर्षे अनुभवली आहे.

याच पार्श्वभूमीवर डिंभे-माणिकडोह बोगद्याची मागणी सातत्याने पुढे आली. २०२२ मध्येही या बोगद्यामुळे कुकडी डाव्या कालव्याला अतिरिक्त आवर्तन मिळण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली होती.

यंदाही कुकडीच्या आवर्तनासाठी शेतकऱ्यांच्या असंतोषाला तीव्र स्वरूप आले होते. पाणी न मिळाल्यास आंदोलनाचा इशाराही देण्यात आला होता. त्यामुळे आज झालेली बोगद्याची मंजुरी ही कागदावरील प्रशासकीय बाब नसून पाण्यासाठी वर्षानुवर्षे संघर्ष करणाऱ्या शेतकऱ्यांच्या दृष्टीने आशेचा मोठा किरण ठरली आहे.

डिंभे धरणातून पावसाळ्यात उपलब्ध होणारे अतिरिक्त पाणी सुमारे १६ किलोमीटर लांबीच्या बोगद्याद्वारे माणिकडोह धरणात वळविण्याची योजना आहे. माणिकडोह धरणाची साठवण क्षमता अधिक प्रभावीपणे वापरता आल्यास कुकडीच्या डाव्या कालव्याच्या लाभक्षेत्राला त्याचा फायदा होणार आहे.

म्हणजेच पावसाळ्यात वाहून जाणाऱ्या अतिरिक्त पाण्याचा उपयोग करून ते भविष्यातील आवर्तनासाठी साठवता येणार आहे. या पाण्याचा लाभ पुणे जिल्ह्यातील जुन्नरसह अहिल्यानगरमधील पारनेर, श्रीगोंदा, कर्जत आणि सोलापूर जिल्ह्यातील करमाळा तालुक्यांना होणार आहे.

कुकडीच्या लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांसाठी सर्वात मोठा प्रश्न राहिला आहे तो म्हणजे आवर्तनाची अनिश्चितता. पिके हातातोंडाशी आलेली असताना पाणी मिळेल की नाही, याची चिंता शेतकऱ्यांना सतावत असते. पाणी उशिरा मिळाले तर उत्पादनावर परिणाम; पाणी मिळालेच नाही तर संपूर्ण हंगाम धोक्यात येतो अशी परिस्थिती अनेकदा निर्माण झाली.

डिंभे-माणिकडोह बोगदा पूर्ण झाल्यास पाण्याच्या उपलब्धतेत वाढ होऊन या भागातील सिंचन व्यवस्थेला अधिक स्थैर्य मिळण्याची अपेक्षा आहे. त्यामुळे श्रीगोंदा-कर्जत-करमाळ्याच्या शेतकऱ्यांच्या शेतीचे भवितव्य बदलण्याची क्षमता या प्रकल्पात आहे.

कुकडी पाटबंधारे प्रकल्पाच्या सुधारित खर्चास मंजुरी मिळाल्याने सुमारे १ लाख ४४ हजार ९१२ हेक्टर सिंचन क्षमता निर्माण होणार आहे. पुणे, अहिल्यानगर आणि सोलापूर जिल्ह्यांतील लाभक्षेत्रासाठी हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे. नियमित सिंचनाचा आधार मिळाल्यास केवळ एखाद्या हंगामाचे पीक वाचणार नाही, तर पीक पद्धतीत बदल, उत्पादनवाढ, शेतकऱ्यांचे उत्पन्न आणि गावोगावच्या अर्थव्यवस्थेला चालना मिळण्याची शक्यता आहे.

दक्षिण अहिल्यानगरच्या दुष्काळी भागात पाण्याचा प्रश्न हा वर्षानुवर्षांचा आहे. उपलब्ध पाण्याचा काटेकोर वापर आणि पावसाळ्यातील अतिरिक्त पाणी साठवून ते योग्य वेळी लाभक्षेत्राला उपलब्ध करून देणे, ही या भागाची कायमची गरज आहे. माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी शेतकऱ्यांना दिलेल्या आश्वासनांचा संदर्भ देत या निर्णयाचे स्वागत केले आहे. साकळाई



योजनेनंतर डिंभे-माणिकडोह बोगद्याचा प्रश्न मार्गी लागल्याचे त्यांनी नमूद केले असून, प्रकल्प पूर्णत्वास नेण्यासाठी पुढील पाठपुरावा सुरू ठेवण्याची भूमिका व्यक्त केली आहे.

मात्र या निर्णयानंतर लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांची अपेक्षा स्पष्ट आहे ती म्हणजे मंजुरीनंतर आता विलंब नको, कामाला प्रत्यक्ष सुरुवात हवी. वर्षानुवर्षे आवर्तनासाठी संघर्ष केलेल्या शेतकऱ्यांना आता बोगदा प्रत्यक्षात दिसण्याची आणि त्यातून पाणी माणिकडोहात पोहोचण्याची प्रतीक्षा आहे. कारण कागदावरील मंजुरीपेक्षा शेताच्या बांधापर्यंत पोहोचणारे पाणीच या निर्णयाचे खरे यश ठरणार आहे.

डिंभे-माणिकडोह बोगदा हा त्यामुळे केवळ एक अभियांत्रिकी प्रकल्प नाही; तो श्रीगोंदा, कर्जत आणि करमाळ्याच्या शेतकऱ्यांच्या अनेक वर्षांच्या पाणीसंघर्षाला मिळालेली नवी दिशा आणि दक्षिण नगरच्या दुष्काळी पट्ट्याच्या पाणीस्वप्नाला मिळालेली आशेची नवी वाट आहे.

## श्रीगोंद्यात कथित सावकारीविरोधात संतोष भोसले यांचा आंदोलनाचा इशारा

● **श्रीगोंदा । वीरभूमी** –
गरीब आणि गरजू नागरिकांच्या अडचणींचा गैरफायदा घेत घरावरच वसुलीचा तगादा लावणाऱ्या कथित खाजगी सावकारांविरोधात श्रीगोंद्यात संताप व्यक्त होत आहे. 'तू माझे पैसे वसूल कर, मी तुझे पैसे वसूल करतो,' अशा पद्धतीने सावकारांची साखळी तयार करून गरीब कुटुंबांवर मानसिक, आर्थिक आणि सामाजिक दबाव आणला जात असल्याचा गंभीर आरोप सामाजिक कार्यकर्ते संतोष भोसले यांनी केला आहे.

कर्ज घेतल्याच्या कारणावरून कुटुंबांना धमकावणे, महिलांचा अपमान व शिवीगाळ करणे, घरातील पुरुष अनुपस्थित असताना घरात प्रवेश करण्याचा प्रयत्न करणे, नातेवाईक व परिचितांमार्फत दबाव आणणे, घरासमोर ठाण मांडून दहशतीचे वातावरण निर्माण करणे, मुलांना घाबरविणे तसेच पोलीस तक्रारीत अडकविण्याची धमकी देणे, असे कथित प्रकार सुरू असल्याचा आरोप भोसले यांनी केला.



काही कुटुंबांनी मूळ रकमेपेक्षा अधिक रक्कम परत केली असतानाही वाढत्या व्याजामुळे कर्जाचा हिशेब संपत नसल्याचा दावा करण्यात आला आहे. सावकारीच्या विळख्यात अडकल्यानंतर पैसा फेडूनही सुटका होत नसल्याची परिस्थिती काही कुटुंबांवर ओढवत असल्याचे भोसले यांनी सांगितले.

सावकार घरी आल्यास त्यांचे फोटो-व्हिडिओ, उपलब्ध कॉल रेकॉर्डिंग, सीसीटीव्ही फुटेज, फोन पे/गुगल पे व्यवहारांच्या नोंदी तसेच सोबत आलेल्या व्यक्तींची माहिती सुरक्षित ठेवावी, असे आवाहन भोसले यांनी केले. सावकारीच्या कथित प्रकाराला बळी पडलेल्या नागरिकांनी न घाबरता उपलब्ध पुरावे पुढे आणावेत, असेही त्यांनी म्हटले आहे. 'पैसे दिल्याचे पुरावे आंदोलनात सादर करणार,' असा इशाराही भोसले यांनी दिला.

कथित खाजगी सावकारीच्या जाळ्याविरोधात प्रशासन व पोलिसांचे लक्ष वेधण्यासाठी श्रीगोंदा तहसील कार्यालय तसेच श्रीगोंदा पोलीस ठाण्यात निवेदन देऊन उपोषण करण्याचा इशारा संतोष भोसले यांनी दिला आहे.

गरीब कुटुंबांच्या आर्थिक अडचणींचा गैरफायदा घेऊन त्यांच्यावर दहशत निर्माण केली जात असेल, तर अशा प्रकारांची चौकशी करून दोषी आढळणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली.

वसुलीच्या नावाखाली कोणत्याही कुटुंबाला मानसिक छळ आणि दहशतीत जगण्याची वेळ येता कामा नये. सावकारीच्या कथित साखळीला कायद्याचा लगाम घालून पीडित कुटुंबांना संरक्षण द्यावे, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते संतोष भोसले यांनी केली आहे.

श्रीगोंद्यातील कथित सावकारीचा हा 'वसुली पॅटर्न' नेमका किती खोलवर आहे, याची प्रशासन आणि पोलीस चौकशी करणार का, याकडे तालुक्याचे लक्ष लागले आहे.

## 'डीजे'ला फाटा देत पारंपरिक वाद्यांच्या गजरात गणेशोत्सव साजरा करा

### पोलीस निरीक्षक आनंद कोकरे यांचे गणेश मंडळांना आवाहन । शांतता समिती व गणेश मंडळांची लवकरच बैठक

● **पाथर्डी । वीरभूमी**–
आगामी गणेशोत्सव शांतता, शिस्त आणि उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यासाठी गणेश मंडळांनी डीजेचा वापर टाळून पारंपरिक वाद्यांना प्राधान्य द्यावे, कोणत्याही प्रकारच्या डीजेसाठी प्रशासनाकडून कोणालाही परवानगी मिळणार नाही. गणेश मंडळांनी मिरवणुकीसाठी पारंपारिक वाद्यांचा वापर करून मोठ्या उत्साहात व शांततेत गणेशोत्सव साजरा करावा असे आवाहन पोलीस निरीक्षक आनंद कोकरे यांनी केले आहे.

गणेशोत्सव हा सामाजिक एकोपा, संस्कृती आणि भक्तीचा उत्सव आहे. त्यामुळे गणेश मंडळांनी ढोल-ताशा, लेझीम, हलगी, पारंपरिक वाद्ये तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून उत्सवाची परंपरा जपावी. ध्वनिप्रदूषणामुळे नागरिक, ज्येष्ठ व्यक्ती, लहान मुले तसेच रुग्णांना त्रास होणार नाही, याची मंडळांनी विशेष काळजी घ्यावी, असे आवाहनही पोलिस प्रशासनाकडून करण्यात आले आहे.



संपूर्ण अहिल्यानगर जिल्ह्यात यंदाचा गणेशोत्सव डीजेमुक्त करण्याच्या दृष्टीने जिल्हा प्रशासनाकडून प्रयत्न करण्यात येणार आहेत. त्या पार्श्वभूमीवर पाथर्डी शहर व तालुक्यातील शांतता समिती तसेच गणेश मंडळांची बैठक वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत लवकरच आयोजित करण्यात येणार आहे. या बैठकीत गणेश मंडळांना उत्सवाच्या नियोजनाबाबत आवश्यक सूचना, परवानग्या, ध्वनिप्रदूषण नियंत्रण, मिरवणुकीचे नियोजन, वाहतूक व्यवस्था आणि कायदा-सुव्यवस्थेबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

गणेश मंडळांनी प्रशासनाला सहकार्य करून 'भक्तीचा उत्सव, ध्वनिप्रदूषणाला आळा' या भूमिकेतून गणेशोत्सव साजरा करावा. मंडळांनी वेळेचे, ध्वनीमर्यादेचे आणि प्रशासनाने दिलेल्या सूचनांचे पालन करावे. गणेशोत्सवादरम्यान कोणत्याही प्रकारच्या डीजेचा वापर करू नये, असे स्पष्ट आवाहन पोलीस निरीक्षक आनंद कोकरे यांनी केले आहे.

परंपरा जपूया, पर्यावरण व नागरिकांचे आरोग्य जपूया आणि शिस्तबद्ध, शांततामय गणेशोत्सव साजरा करूया, असा संदेश पोलिस प्रशासनाने गणेश मंडळांना दिला आहे.

## अपघातातील नुकसानभरपाईसाठी मुळा पाटबंधारे कार्यालयासमोर विलास कराळे यांचे आमरण उपोषण

● **अहिल्यानगर । वीरभूमी** –
मुळा पाटबंधारे विभागात कार्यरत असलेले आकाश ठोंबरे यांच्या वाहनाच्या धडकेत आपला उजवा पाय मोडल्याचा आरोप करीत विलास कराळे पाटील यांनी नुकसानभरपाईच्या मागणीसाठी मुळा पाटबंधारे कार्यालयासमोर बेमुदत आमरण उपोषण सुरू केले आहे. अपघातानंतर उपचाराचा खर्च देण्याचे आश्वासन देण्यात आले होते; मात्र आता नुकसानभरपाई देण्यास टाळाटाळ होत असल्याचा दावा कराळे यांनी केला आहे.

कराळे यांच्या म्हणण्यानुसार, ते भिस्तबाग चौकाकडे जात असताना आकाश ठोंबरे यांच्या वाहनाने पाठीमागून धडक दिली. या अपघातात त्यांच्या उजव्या पायाला गंभीर दुखापत होऊन पाय मोडला. त्यानंतर त्यांना पाईपलाईन परिसरातील खाजगी रुग्णालयात उपचारासाठी नेण्यात आले. प्राथमिक उपचारानंतर पुढील उपचारासाठी त्यांना सावेडी येथील डवले हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. तेथे त्यांच्या पायावर शस्त्रक्रिया करण्यात आली. या उपचाराचा खर्च ठोंबरे यांच्या वडिलांनी केला असल्याचे कराळे पाटील यांनी सांगितले.

दरम्यान, पायामध्ये बसविण्यात आलेली सळई व स्क्रू पुढील काळात काढण्याची गरज असून, मधुमेहामुळे उपचाराला विलंब झाल्याचेही त्यांनी सांगितले. पुढील उपचारांचा खर्च तसेच नुकसानभरपाई देण्याचे आश्वासन ठोंबरे यांच्या वडिलांनी दिले होते. त्यांच्या निधनानंतर त्यांचा मुलगा आकाश ठोंबरे यांनीही एक ते दीड महिन्यात नुकसानभरपाई देण्याचे आश्वासन दिल्याचा दावा कराळे पाटील यांनी केला आहे.

मात्र, आता नुकसानभरपाई देण्यास नकार दिला जात असून, मागणी करण्यासाठी गेल्यानंतर घरातील महिलांना पुढे करून खोटे गुन्हे दाखल करण्याची धमकी दिली जात असल्याचा आरोपही कराळे पाटील यांनी केला आहे.

आपल्याला झालेल्या शारीरिक, मानसिक व आर्थिक नुकसानीची भरपाई तातडीने देण्यात यावी, तसेच संबंधितांकडून दिलेला शब्द पाळण्यात यावा, या मागणीसाठी कराळे यांनी मुळा पाटबंधारे कार्यालयासमोर बेमुदत आमरण उपोषण सुरू केले आहे.

## शिरसाटवाडीत २००९ बॅचचा स्नेहमेळावा उत्साहात

### ज्या घरट्याने ऊब दिली, ते कधीही विसरू नये । जुन्या आठवणींना उजाळा देत गुरुजनांप्रती कृतज्ञता

● **पाथर्डी । वीरभूमी** –
पाथर्डी तालुक्यातील शिरसाटवाडी येथील श्री भैरवनाथ माध्यमिक विद्यालयात रविवारी दहावीच्या सन २००९ बॅचच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा उत्साहपूर्ण व भावपूर्ण वातावरणात पार पडला. बळ आल्यावर प्रत्येक पाखराने आकाशात जरूर उडावे; पण ज्या घरट्याने आपल्याला ऊब दिली, ते घरटे विसरू नये, या विचाराने प्रेरित होऊन या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक अशोक सानप होते. त्यांच्या मार्गदर्शन व नियोजनाखाली हा कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला. माजी विद्यार्थी तुषार शिरसाट यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी नजन सर यांचे विशेष मार्गदर्शन लाभले.

कार्यक्रमादरम्यान गतकाळात दिवंगत झालेले शिक्षक, मुख्याध्यापक व विद्यार्थी यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली. शिक्षक शरद नजन, पांडुरंग चव्हाण, रामदास जेधे आणि शिवाजी शिरसाट यांनी मनोगत व्यक्त केले.

२००९ बॅचचे सर्व माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी सर्वांनी शाळेतील जुन्या आठवणींना उजाळा देत मनमोकळा संवाद




साधला. आपल्या जडणघडणीत मोलाचा वाटा असलेल्या शाळा व गुरुजनांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हा स्नेहमेळावा भावनिक आणि आनंददायी ठरला.

# एकल महिला सर्वेक्षणासाठी कागद, काच, पत्रा कष्टकरी पंचायतचा पुढाकार

## घरोघरी जाऊन सर्वेक्षणासाठी महापालिकेला सहकार्य करणार । पात्र महिलांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्याची मागणी

● **अहिल्यानगर । वीरभूमी** –
अहिल्यानगर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील एकही पात्र एकल महिला शासनाच्या योजनांपासून वंचित राहू नये, यासाठी घरोघरी जाऊन करण्यात येणाऱ्या एकल महिला सर्वेक्षणास कागद, काच, पत्रा कष्टकरी पंचायत, अहिल्यानगर यांनी पूर्ण सहकार्य करण्याची तयारी दर्शविली आहे. याबाबत पंचायतच्या वतीने महानगरपालिका आयुक्तांना अधिकृत पत्र देण्यात आले आहे. शहरातील कष्टकरी, कचरा वेचक तसेच आर्थिक व सामाजिकदृष्ट्या वंचित महिलांशी संस्थेचा थेट संपर्क असल्याने सर्वेक्षण अधिक व्यापक आणि प्रभावी करण्यासाठी प्रशासनासोबत प्रत्यक्ष क्षेत्रात काम करण्याची भूमिका पंचायतने घेतली आहे.

जिल्हा समन्वयक विकास भाऊसाहेब उडानशिवे यांनी सांगितले की, शहरातील एकही पात्र एकल महिला या सर्वेक्षणातून वंचित राहू नये, हा संस्थेचा प्रमुख उद्देश आहे. केवळ कार्यालयीन पातळीवर माहिती संकलित करून हे सर्वेक्षण पूर्ण न करता प्रत्यक्ष वस्त्या, झोपडपट्ट्या, कष्टकरी वसाहती आणि कामाच्या ठिकाणी जाऊन महिलांपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. त्यासाठी कागद, काच, पत्रा कष्टकरी पंचायत प्रशासनाला आवश्यक ते सर्व सहकार्य करणार आहे.

कागद, काच, पत्रा कष्टकरी पंचायत ही संस्था कष्टकरी, कचरा वेचक तसेच आर्थिक व सामाजिकदृष्ट्या वंचित महिलांच्या विविध प्रश्नांवर सातत्याने काम करत आहे. संस्थेच्या प्रत्यक्ष क्षेत्रीय कामातून शहरातील अनेक गंभीर सामाजिक व आर्थिक समस्या समोर आल्या आहेत. आज अनेक महिला अत्यंत तरुण वयात विधवा होत आहेत. काही कुटुंबांमध्ये व्यसनाधीनतेमुळे आर्थिक परिस्थिती ढासळत असून त्याचा थेट परिणाम महिलांवर आणि त्यांच्या मुलांवर होत आहे. पतीच्या निधनानंतर अनेक ३० ते ४० वर्षांच्या महिलांवर एक-दोन मुलांच्या संगोपनाची संपूर्ण जबाबदारी येऊन पडते. घरखर्च, मुलांचे शिक्षण, आरोग्य आणि दैनंदिन गरजा भागविण्यासाठी स्थिर उत्पन्नाचे साधन नसल्याने या महिलांसमोर मोठे संकट उभे राहते.

उदरनिर्वाहासाठी कोणताही पर्याय नसल्याने अनेक महिलांना नाईलाजाने कचरा वेचण्याच्या कामाकडे वळावे लागते. पहाटेपासून रस्त्यावर, कचराकुंड्यांजवळ तसेच शहरातील विविध भागांत कचरा गोळा करून या महिला आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. मुलांचे भविष्य सुरक्षित करण्यासाठी त्या दिवसभर कष्ट करतात. कचरा वेचणारी महिला ही केवळ कचरा गोळा करणारी व्यक्ती नसून ती अनेक कुटुंबांची कमावती व्यक्ती, मुलांच्या भविष्याचा आधार आणि शहराच्या स्वच्छतेत महत्त्वपूर्ण योगदान देणारी कष्टकरी महिला आहे, असे उडानशिवे यांनी स्पष्ट केले.

मात्र अशा अनेक महिलांची प्रशासनाकडे अधिकृत नोंद नसण्याची शक्यता आहे. काही महिला दिवसभर कामानिमित्त घराबाहेर असतात. त्यामुळे सर्वेक्षण पथक घरी पोहोचले तरी संबंधित महिला उपलब्ध नसू शकते. काही महिलांना सर्वेक्षणाची माहिती मिळत नाही, तर सामाजिक, आर्थिक किंवा कौटुंबिक परिस्थितीमुळे काही महिला स्वतःहून प्रशासनापर्यंत पोहोचण्यास संकोच करतात. त्यामुळे सर्वेक्षण करताना पारंपरिक पद्धतीपेक्षा अधिक व्यापक आणि प्रत्यक्ष क्षेत्राधारित पद्धतीचा अवलंब करणे आवश्यक असल्याचे पंचायतने म्हटले आहे.

शहरातील कष्टकरी आणि कचरा वेचक महिलांशी कागद, काच, पत्रा कष्टकरी पंचायतचा सातत्याने संपर्क असल्याने या महिलांपर्यंत प्रशासनाची माहिती पोहोचविण्यात संस्था महत्त्वाची भूमिका बजावू शकते. त्यामुळे महानगरपालिका प्रशासनास सर्वेक्षणाच्या कामात सहकार्य करण्याची तयारी पंचायतने दर्शविली आहे. यामध्ये पात्र महिलांपर्यंत सर्वेक्षणाची माहिती पोहोचविणे, सर्वेक्षण पथकाला संबंधित महिलांपर्यंत पोहोचण्यासाठी मदत करणे, दिवसभर कामानिमित्त घराबाहेर असलेल्या महिलांचा शोध घेणे तसेच अत्यंत गरजू आणि दुर्लक्षित महिलांची माहिती प्रशासनापर्यंत पोहोचविणे, अशी कामे पंचायतच्या माध्यमातून केली जाणार आहेत.

एकल महिलांचे सर्वेक्षण हे केवळ



आकडेवारी गोळा करण्यापुरते मर्यादित न राहता त्यातून प्रत्यक्ष महिलांच्या जीवनात बदल घडवून आणणारी प्रक्रिया ठरावी, अशी पंचायतची भूमिका आहे. विशेषतः विधवा, परित्यक्ता, घटस्फोटित, पतीपासून विभक्त राहणाऱ्या तसेच अत्यंत गरिबीत मुलांचा सांभाळ करणाऱ्या महिलांची काळजीपूर्वक नोंद होणे आवश्यक असल्याचे संस्थेने म्हटले आहे. या महिलांच्या सामाजिक व आर्थिक परिस्थितीचा स्वतंत्रपणे विचार करून त्यांना आवश्यक त्या योजनांशी जोडण्याची गरज आहे. सर्वेक्षण पूर्ण झाल्यानंतर पात्र महिलांना केवळ प्रमाणपत्र किंवा नोंदणीपुरते मर्यादित न ठेवता त्यांना आवश्यक त्या शासकीय योजनांचा प्रत्यक्ष लाभ मिळवून देण्यासाठी पुढील कार्यवाही करण्यात यावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.